International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.065
Vol.7 No.5 July – Aug. 2020

# भारतीय राजकारणामधील समस्यांचा आढावा

डॉ. आकाश शेषराव बांगर
संशोधक विध्यार्थी, आदर्श महाविद्यालय, हिंगोली

**प्रस्तावना**

ब्रिटिश सरकार विरोधात झालेल्या प्रदीर्घ संघर्षानंतर भारताला १५ ऑगस्ट१९४७ रोजी स्वातंत्र्य प्राप्त झाले. वास्तविक पाहता या स्वातंत्र्यलढ्याची सुरुवात १८५७ च्या उठावापासूनच झालेली होती. परंतु ब्रिटिशांच्या पार-तंत्र्यांमधून बाहेर पडण्यास भारताला इसवी सन १९४७ ची वाट पहावी लागली. दरम्यानच्या काळामध्ये सरकार विरोधात अनेक आंदोलने व चळवळी झालेल्या होत्या.१ ऑगस्ट १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचे निधन झाल्यानंतर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेतृत्व महात्मा गांधीजी यांच्याकडे आले होते. गांधीजींच्या नेतृत्वामध्ये ब्रिटिश सरकार विरोधात अनेक आंदोलने व चळवळी निर्माण करण्यात आल्या. इसवी सन १९४२ मध्ये महात्मा गांधीजींनी ब्रिटिश सरकारच्या विरोधामध्ये शेवटचे व निर्णायक आंदोलन करण्याचा निर्णय घेतलेला होता आणि याच आंदोलनामध्ये भारतीय लोकांना उद्देशून 'Do or die' हा नारा त्यांनी दिला होता. ब्रिटिश सरकार विरोधात झालेले हे सर्वात मोठे आंदोलन होते. या आंदोलनामध्ये जवळपास घरातला प्रत्येक जण हा रस्त्यावर उतरलेला होता. याच आंदोलनामध्ये सरकारच्या हे लक्षात आले की, भारतीय जनमत हे पूर्णपणे आपल्या विरोधात गेलेले आहे आणि आपण भारतामध्ये अधिक काळ राज्यकारभार करू शकत नाही. त्यामुळेच भारताला लवकरच स्वातंत्र्य देण्याची मानसिकता सरकारने केलेली होती व भारताला स्वातंत्र्य देण्याची कबुलीच दिलेली होती. अखंड हिंदुस्तानची फाळणी करून १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतु तत्पूर्वीच स्वतंत्र भारतासाठी संविधान तयार करण्याचे काम सुरू झालेले होते.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान तयार करण्याचे काम पूर्ण झाले. परंतु या संविधानाची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० पासून करण्यात आली. अशाप्रकारे भारत हा एक प्रजासत्ताक देश बनला. भारतीय संविधान या देशासाठी लागू होऊन जवळपास ७२ वर्ष उलटून गेलेली आहेत. भारतामध्ये लोकशाही बऱ्यापैकी स्थिर सुद्धा झालेली आहे. परंतु भारतीय राजकारणामध्ये काही गंभीर अशा प्रकारचे प्रश्न निर्माण झालेले आहेत जे भारतीय लोकशाहीसाठी अत्यंत धोक्याचे संकेत निर्माण करत आहेत.

**संशोधनाचा उद्देश**

प्रस्तुत संशोधन लेखामध्ये भारतीय राजकारणामध्ये ज्या प्रमुख समस्या निर्माण झालेल्या आहेत त्या समस्यांचा आढावा घेण्यात येणार आहे. निश्चितच हे प्रश्न भारतीय लोकशाहीसाठी फार मोठे आव्हान ठरत आहेत. भारतीय राजकारणातील प्रमुख प्रश्न कोणते आहेत त्या प्रश्नांचा आढावा घेणे हा या संशोधन लेखाचा मुख्य उद्देश आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधनात्मक शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. त्यासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग केला आहे. दुय्यम तथ्ये संकलनासाठी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील संदर्भग्रंथ इंटरनेट सेवा इ. माध्यमांचा उपयोग केला आहे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम तथ्य संकलनाचा उपयोग केला आहे. त्यात संदर्भग्रंथ, पुस्तके, वृत्तपत्रे, इंटरनेट इ. चा उपयोग केला आहे

**भारतीय राजकारणातील प्रमुख समस्या**

स्वातंत्र्यानंतर भारतीय राजकारणाचे अध्ययन केल्यास भारतीय राजकारणामध्ये जे काही प्रश्न निर्माण झालेले आहेत ते पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील

**धर्म**

धर्म हा भारतीय राजकारणाचा केंद्रबिंदू राहिलेला आहे यास स्वातंत्र्यपूर्वीपासूनची पार्श्वभूमी लाभलेली आहे. जेव्हा ब्रिटिशांविरोधात भारतीयांचा स्वातंत्र्यलढा सुरू होता आणि या स्वातंत्र्य लढ्यास एक व्यापक स्वरूप प्राप्त झालेले होते त्यावेळेला जाणीवपूर्वक ब्रिटिश सरकारने हे स्वातंत्र्य आंदोलन दडपून टाकण्यासाठी किंवा या आंदोलनाची तीव्रता कमी करण्यासाठी धर्माच्या आधारावर भारतीय लोकांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न केलेला होता. त्यासाठी 'फोडा आणि राज्य करा ' (Divide and Rule) ही नीती ब्रिटिशांनी अगदी सुरुवातीपासून अवलंबविलेली होती. हिंदू व मुस्लिम समाजामध्ये फूट पाडण्यासाठी इस.१९०५ मध्ये बंगालचे विभाजन करण्याचा निर्णय ब्रिटिशांनी घेतला होता. अप्रत्यक्षपणे मुस्लिम धर्मीयांना याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला की, तुम्ही हिंदूंपासून वेगळे आहात आणि तुमचे हितसंबंध हे पूर्णपणे वेगळे आहेत ते जपण्याचा प्रयत्न तुम्ही केला पाहिजे तुमचे अस्तित्व हिंदूपेक्षा पूर्णपणे वेगळे आहे. याचीच परिणीती म्हणून पुढे चालून मुस्लिम लीगची स्थापना करण्यात आली आणि मुस्लिम लीगने सातत्याने मुस्लिम धर्मासाठी वेगळ्या राष्ट्राची मागणी लावून धरली. बॅरिस्टर मोहम्मद अली जिना यांच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानची मागणी ही सातत्याने करण्यात आली. कोणत्याही परिस्थितीमध्ये स्वतंत्र पाकिस्तान हे राष्ट्र झाले पाहिजे ही भूमिका त्यांनी शेवटपर्यंत घेतली व कोणत्याही परिस्थितीमध्ये माघार घेण्यास ते तयार नव्हते. अशाप्रकारे अखंड हिंदुस्तानची फाळणी करून स्वातंत्र्य बहाल करण्यात आले. या फाळणीच्या वेदना व जखमा आजही तीव्र आहेत, त्या समस्यांशी आपण सामना करत आहोत. दुर्दैवाने स्वातंत्र्यनंतर सुद्धा भारताचे राजकारण हे धर्माभोवती केंद्रित झालेले आहे. विशेषतः इस. १९९० च्या दशकापासून भारतीय राजकारणामध्ये धर्माची भूमिका ही महत्त्वपूर्ण राहिलेली आहे. पूर्वाश्रमीच्या जनसंघ या पक्षाचे रूपांतर इस. १९८० मध्ये श्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षामध्ये करण्यात आले. भारतीय जनता पक्षाचे महत्त्वाचे नेते व संस्थापक सदस्य श्री लाल कृष्ण आडवाणी यांनी इस.१९९० मध्ये सोमनाथ ते अयोध्या या दरम्यान रथयात्रा काढण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून भारतीय राजकारणामध्ये ध्रुवीकरणाची प्रक्रिया निर्माण झाली. दुर्दैवाने इसवी सन १९९२ मध्ये बाबरी मस्जिद पाडण्यात आली. आणि या देशाचे धार्मिक वातावरण पूर्णपणे बदलले. निश्चितपणे वर्तमान परिस्थितीमध्ये सुद्धा भारतीय राजकारण हे पूर्णपणे धर्माभोवती फिरताना दिसत आहे. किंबहुना धर्म हा भारतीय राजकारणाचा एक अत्यंत महत्त्वाचा केंद्रबिंदू ठरलेला आहे ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. वास्तविक पाहता भारतीय संविधानाच्या माध्यमातून आपण या देशासाठी धर्मनिरपेक्षतेची संकल्पना स्वीकारलेली आहे. भारत हा एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे हे स्पष्ट करण्यात आलेला आहे.

**जात**

भारतामध्ये जवळपास ८७ % लोक हे जरी हिंदू धर्मीय असले तरी ते वेगवेगळया जातीमध्ये जातीमध्ये विभागलेले आहेत ही वस्तुस्थिती आहे. या गोष्टीचे अत्यंत चांगल्या प्रकारे विश्लेषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'Annihilation of cast' या आपल्या पुस्तकामध्ये केलेले आहे. भारतामध्ये वेगवेगळया घटक राज्यांमध्ये विशिष्ट जातीचा प्रभाव आढळून येतो. उदाहरणार्थ महाराष्ट्र मध्ये मराठा, आंध्र प्रदेश मध्ये रेड्डी, उत्तर प्रदेश मध्ये यादव, राजस्थानमध्ये जाट अशाप्रकारे भारताच्या प्रत्येक घटक राज्यामध्ये विशिष्ट जातीचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे या विशिष्ठ जातीभोवती राज्याचे राजकारण फिरताना दिसते. सरकारकडून बहुसंख्य असलेल्या जातीला खुश करण्यासाठी किंवा त्या विशिष्ट जातीच्या मतांवरती डोळा ठेवून त्याला अनुसरून अशा प्रकारचे धोरण स्वीकारण्यात येते. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे वेगवेगळया राजकीय पक्षांकडून जातीयवादाला प्रोत्साहन देण्याचे कार्य होत आहे.

**भाषा**

स्वातंत्र प्राप्तीपासूनच भाषा ही भारतीय राजकारणातील एक समस्या व महत्त्वाचा केंद्रबिंदू राहिलेला आहे. ब्रिटिश सरकारने प्रशासनाच्या सोयीसाठी प्रांत रचना केलेली होती. परंतु स्वातंत्र्यानंतर अशा प्रकारची प्रांत रचना कायम ठेवणे शक्य नव्हते. त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भाषेच्या आधारावर प्रांताची पुनर्रचना करावी अशा प्रकारची मागणी जोर धरत होती. तेलगू भाषिकांसाठी आंध्र प्रदेश या राज्याची निर्मिती व्हावी याकरिता श्री पोट्टु रामलू यांनी आमरण उपोषण केले. दुर्दैवाने त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला, त्यामुळे इसवी सन १९५३ मध्ये तेलगू भाषकांसाठी आंध्र प्रदेश या राज्याची निर्मिती करण्यात आली. अशा प्रकारे भाषेच्या आधारावर निर्माण होणारे आंध्र प्रदेश हे देशातील पहिले राज्य ठरले. त्यानंतर अनेक भागांमधून भाषेच्या आधारावर राज्यांची निर्मिती व्हावी अशा प्रकारची मागणी पुढे आली. महाराष्ट्र मध्ये सुद्धा स्वातंत्र्य पूर्वीपासूनच मराठी भाषिकांसाठी मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना व्हावी अशा प्रकारची मागणी पुढे येत होती. परंतु केंद्र सरकारची भूमिका त्यापेक्षा वेगळी होती मुंबई या प्रांताचे स्वतंत्र राहावे अशी केंद्र सरकारची धारणा होती. किंबहुना न्या. दार आयोग, JVP समिती, न्या. फझल अली आयोग या सर्व आयोगाने मुंबईचा समावेश महाराष्ट्र राज्यामध्ये होऊ नये अशा प्रकारचा निष्कर्ष नोंदविला होता. शेवटी प्रदीर्घ संघर्षानंतर मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना १ मे १९६० रोजी करण्यात आली. परंतु त्याकरिता जवळपास १०५ जणांना आपल्या प्राणाचे बलिदान द्यावे लागले होते. दुर्दैवाने वर्तमान परिस्थितीमध्ये संपूर्ण देशांमध्ये भाषेच्या आधारावर राजकारण करण्याचा प्रयत्न अनेक राजकीय पक्ष करत आहेत. काही राजकीय पक्षांची स्थापना भाषिक हितसंबंध जपण्याच्या उद्देशातून झालेली आहे. उदा. आंध्र प्रदेश मध्ये तेलगु देसम पार्टी, महाराष्ट्र मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना इ. विशिष्ट भाषकांच्या हितसंबंधासाठी सातत्याने राजकारण करण्यात येते. केंद्र सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न करण्यात येतो व विशिष्ट भाषिकांची मते मोठ्या प्रमाणामध्ये आपणास कशाप्रकारे प्राप्त करता येतील यासाठी विशिष्ट अशा प्रकारची रणनीती आखण्यात येते यास कोणताही राजकीय पक्ष अपवाद नाही. भाषिक अस्मिता जागृत करून त्या माध्यमातून राजकीय लाभ प्राप्त करण्याचा प्रयत्न राजकीय पक्षांकडून करण्यात येतो ही देशाच्या राजकारणातील एक अत्यंत मोठी समस्या निर्माण झाली आहे. उत्तर भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर हिंदी ही भाषा बोलली जाते परंतु दुर्दैवाने दक्षिण भारतामध्ये या भाषेला विरोध करण्यात येतो व मोठ्या प्रमाणावर या मुद्द्यावरून राजकारण सुद्धा केले जाते. भारतामध्ये जवळपास ४३ .६३ % लोक हिंदी भाषा बोलतात. राजकारणामध्ये भाषेच्या आधारावर सुद्धा लोकांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न केला

जातो. दुर्दैवाने हे भारताच्या राजकारणाचे वास्तव आहे. स्वातंत्र्य प्राप्त होऊन जवळपास ७५ वर्ष उलटून गेली आहेत. त्यामुळे हा प्रकार थांबला पाहिजे. अन्यथा भारतीय लोकशाहीला हा सर्वात मोठा धोका निर्माण होऊ शकतो. भारतीय लोकशाहीचे भवितव्य जर उज्वल करायचे असेल तर निश्चितपणे लोकांची भाषिक अस्मिता किंवा भाषिक आधारावरचे राजकारण थांबविणे गरजेचे आहे.

**भ्रष्टाचार**

भ्रष्टाचार ही भारतीय राजकारणातील व प्रशासनातील एक फार मोठी समस्या बनलेली आहे. भ्रष्टाचाराचे प्रमाण हे दिवसेंदिवस वाढत चालले आहे. सरकारने कितीही चांगले धोरण स्वीकारले तरीही त्याची अंमलबजावणी मात्र प्रभावीपणे आणि समाधानकारकरीतीने होताना दिसून येत नाही. सरकारच्या कोणत्याही योजनेचा लाभ थेट सामान्य माणसापर्यंत पोहचत नाही. भारताचे माजी पंतप्रधान श्री एच.डी. देवैगौडा यांनी भ्रष्टाचाराच्या संदर्भामध्ये असे म्हटले होते की, ‘corruption in Indian administration is like a cancer , we cannot stop it.’. निवडणुकीच्या काळामध्ये सुद्धा प्रचंड मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होतो ही वस्तुस्थिती आहे. पैशाच्या बळावर अक्षरशः मतदान विकत घेण्याचा प्रयत्न केला जातो. वास्तविक पाहता लोकशाहीमध्ये मतदान हा एक पवित्र हक्क आहे. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान समितीमध्ये अशा प्रकारची भूमिका व्यक्त केली होती की, जोपर्यंत या देशातील प्रत्येक मतदाराला आपल्या मताची किंमत कळणार नाही, तोपर्यंत या देशातील लोकशाही खऱ्या अर्थाने कधीही यशस्वी होऊ शकणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सामाजिक आणि आर्थिक लोकशाही अपेक्षित होती. भारतामध्ये मोठे घोटाळे समोर आले आहेत. विशेषतःइसवी सन १९८० च्या दशकापासून भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढलेले दिसून येते. दुर्दैवाने आज जगामध्ये भ्रष्टाचाराच्या बाबतीत भारताचा ८५ वा क्रमांक लागतो.

**निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधनाअंती काही निष्कर्ष समोर येतात, त्यामध्ये भारतीय राजकारणामध्ये वरील प्रमुख समस्या वर्तमान परिस्थिती निर्माण झालेल्या आहेत. प्रामुख्याने धर्म, जात, भाषा, भ्रष्टाचार या प्रश्नांनी भारतीय राजकारणाला पर्यायाने भारतीय लोकशाहीला संपूर्णपणे ग्रासलेले आहे. भारतीय लोकशाहीचे भवितव्य जर उज्वल करायचे असेल तर राजकारणामधून या समस्या नष्ट करण्यासाठी सरकारकडून आणि जनतेने सुद्धा प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. जात, धर्म, भाषा ,प्रांत, भ्रष्टाचार या भारतीय राजकारणामधील प्रश्न दिवसेंदिवस अधिक तीव्र बनत चालले आहेत. भारत सरकारने या समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी एक व्यापक धोरण स्वीकारणे गरजेचे आहे. परंतु केवळ सरकारकडून आणि राजकीय पक्षांकडून प्रयत्न करून चालणार नाही. तर सामान्य जनतेचे सुद्धा तेवढेच सहकार्य गरजेचे आहे. कारण जागरूक नागरिक हेच लोकशाहीचे खरे पहारेकरी समजले जातात. जर नागरिक जागरूक नसतील तर कोणत्याही देशातील लोकशाही धोक्यामध्ये येण्यास वेळ लागणार नाही.

**संदर्भसूची**

१. भारतीय गणराज्याची शासन पद्धती - डॉ. भा.ल. भोळे.
२. भारतीय शासन आणि राजकारण - डॉ. अलका देशमुख
३. India Today
४. महाराष्ट्र टाइम्स